शुश्रुषा सिटीझन्स् को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स् लि., मुंबई या सहकारी संस्थेस भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२२/२२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :-

शुश्रुषा सिटीझन्स् को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स् लि., मुंबई या सहकारी संस्थेस विक्रोळी, मुंबई येथे परवडणा-या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता रु.२५ कोटी इतके भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २१.११.२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. मंत्रीमंडळाच्या सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मा.मंत्री, सहकार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

शुश्रुषा सिटीझन्स् को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स् लि., मुंबई या सहकारी संस्थेस विक्रोळी, मुंबई येथे परवडणा-या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता रु.२५ कोटी इतके भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २१.११.२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शुश्रुषा सिटीझन्स् को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स् लि., मुंबई या सहकारी संस्थेला भाग भांडवल देण्याच्या प्रस्तावासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळाचे सर्व अधिकार असलेली मा.मंत्री, सहकार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती पुढीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

१) श्री.सुभाष देशमुख, मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग - अध्यक्ष.
२) श्री.पांडुरंग फुंडकर, मंत्री, कृषी व फलोत्पादन.
३) डॉ.रणजीत पाटील, राज्यमंत्री, गृह (शहरे), नगरविकास, विधी व न्याय, संसदीय कार्ये, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण.
४) श्री.एस्.एस्.संधू, अपर मुख्य सचिव, सहकार - सदस्य सचिव.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या बेवसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०२१६१४००४२५९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2018.02.16 14:07:54 +05'30'

(दि.शि. देसाई)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.मंत्री, कृषी, फलोत्पादन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

३. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे), नगरविकास, विधी व न्याय, संददीय कार्ये, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा.राज्यमंत्री (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५. मा.मुख्यमंत्री यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.
६. मुख्य सचिव यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.
७. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. अपर मुख्य सचिव, सहकार यांचे स्विय सहाय्यक.
१०. निवड नस्ती (२२- स).